# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/०३/२०२२ (मंगळवार)

---

## —: चोरी (बॅग लिफ्टींग) :—

पो.स्टे. रामटेक :— रामटेक शहर अंतर्गत एचडीएफसी बॅकेचे समोर सावरकर हेअर सलुन येथे दिनांक २८/०२/२०२२ चे १५/१० वा.ते १५/३० वा दर. पारडीकला निमखेडा ता. मौदा येथील राहणारा शुभम राधेशाम राऊत हा एचडीएफसी बॅकेतुन पैसे काढून बॅकेचे बाहेर आपले मोटार सायकल जवळ गेला असता एक अनोळखी इसमांनी नजर चुकवुन त्याचे मानेवर काहीतरी टाकले व दुसऱ्या अनोळखी व्यक्तीने तुझ्या मानेवर काहीतरी लागले आहे, समोर कटिंगचे दुकान आहे तेथे जावुन धुवुन घे असे सांगुन सावरकर हेअर सलुन येथे घेवुन गेला. तेथे शुभम राधेशाम राऊत चे लक्ष विचलित केले. शुभम राधेशाम राऊत हा आपला चेहरा मान साफ करित असतांना अज्ञात इसमाने शुभम राधेशाम राऊत चे नगदी २,५०,००० रु. बॅगसह चोरून नेले

सदर प्रकरणी फिर्यादी शुभम राधेशाम राऊत वय २४ वर्ष रा. पारडीकला निमखेडा ता.मौदा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात अरोपी विरुध्द पो.स्टे. रामटेक येथे अप क्रमांक १४०/२०२२ कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करुन करण्यात आला असून आरोपीचे शोध घेणे सुरु आहे. तपास सपोनि विवेक सोनवणे मो.नं.९८२३०१७४२४ हे करित आहेत.

## —: घरफोडी :—

पो.स्टे.सावनेर :— अंतर्गत ३ किमी अंतरावरीत नविन गुजरखेडी येथील निवासी लिला चुन्नीलाल सुर्यवंशी हे दिनांक २८/०२/२०२२ रोजी सकाळी आपल्या परिवारासह बाहेरगावी गेले असता कोणीतरी अज्ञात इसमांने त्यांचे घराच्या दरवाजाचा ताला तोडून घरामध्ये प्रवेश करुन लोखंडी आलमारीत ठेवलेले सोन्याचे ५१.०९ ग्राम वजनाचे जूने पावरते दागीणे कि. १,३५,११०/— व ७०० ग्राम वजनाचे चांदीचे जूने वापरते दागीणे कि. १४,०००/— असा एकुण १,४९,११०/— किमतीने दागीणे चोरुन नेला

सदर प्रकरणी फिर्यादी लिला चुन्नीलाल सुर्यवंशी वय ३४ वर्ष रा. नवीन गुजरखेडी ता. सावनेर मो क्र ७०७३५०१२०५, ८४५९२८३१७५ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात अरोपी विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे अप क्रमांक १२५/२०२२ कलम ४५४,४५७,३८० भा.द.वी अन्वये गुन्हा नोंद करुन करण्यात आला असून आरोपीचे शोध घेणे सुरु आहे. तपास सफौ अनिल तिवारी मो. नं.९६८९८९१४८६ हे करित आहेत.

## —: चोरी :—

पो.स्टे. कन्हान :— दि.२७.२.२२ चे २३.४५ वा चेतन धरमसिंग चौव्हान यांनी ट्रक क्र एम.एच ४० बी एल २५२६ व कमलेश गोदुळे यांनी ट्रक क्र. एम.एच ४० बी जी ७९२१ ट्रक मध्ये चिचोली (म.प्र) येथुन रेती भरुन हिंगणा नागपुर येथे जाण्यास निघाले असता कन्हान पासून ४ किमी अंतरावरील बोरडा टोल नाका जवळ दि.२८.२.२२ चे ०३.३० वा पोहचुन सर्विस रोडवर दोन्ही चालकांनी आपले ट्रक चालक ट्रक उभे करुन झोंपले असता चेतन धरमसिंग

चौव्हान चे उशी खाली ठेवलेले २५,०००/– रु व कमलेश गोदुळे याचे खीस्यात ठेवलेले ३२,०००/– रु खीसा कापुन असे एकुण ५७००० रु कोणीतरी अज्ञात इसमांनी चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी चेतन धरमसिंग चौव्हान वय ३२ वर्ष रा. स्वामी विवेकानंद नगर रिलायन्स टावर जवळ कन्हान यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात विरुध्द पो.स्टे. कन्हान येथे अप क्रमांक ९५/२०२२ कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील पोहवा खुशाल रामटेके मो.न. ९२८४२६२५९६ हे करित आहे

## –: अल्पवयीन मुलीवर लैगीक अत्याचार :–

पो.स्टे. नरखेड :– दिनांक २८/०२/२०२२ फिर्यादी यांनी पोलीस स्टेशनला येवून आपली रिपोर्ट नोंदविली की, दिनांक २०/०२/२०२२ रोजी राजेंद्र रामचंद्र रेवतकर वय २५ वर्ष यांनी फिर्यादीची ०६ वर्षची अल्पवयीन मूलगी हिला पिंगर खायला देण्याचे बहाण्याने त्याचे घरात बोलावून तिला कवटयात पकडून त्याचे घरात असलेल्या पलंगावर टाकून तिच्या शोबत लैगिक अत्याचार केला.

फिर्यादीचे व आरोपी कूटूबांशी चांगले संबध असल्याने तसेच तीचे पतीशी पटत नसल्याने काय करावे समजत नव्हते म्हणून फिर्यादी ही आठ दिवसानंतर पोस्टे ला येवुन तोंडी रिपोर्ट दिल्याने सदर प्रकरणी आरोपी राजेंद्र रामचंद्र रेवतकर वय २५ वर्ष याचें विरुध्द पो.स्टे. नरखेड येथे अप क्रमांक ६१/२०२२ कलम ३७६(अब),३४२ भादवि, सहकलम ४,६ पोक्सो कायदा अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास मपोउपनि पुनम कोरडे पोक्सो सेल काटोल विभाग काटोल मो. क्र. ७२७६३३०४५५ हया करित आहेत.

## –: फसवणुक :–

पो.स्टे. काटोलः– काटोल शहर अंतर्गत सरस्वतीनगर येथील निवासी विरेन्द्र दामोदर वर्मा यांना दिनांक १३/०१/२०२२ रोजी मोबाईल क्र.८५९७९४८७५२ धारक ने त्यांना मोबाईल क्र. ९४२२८०८०३१ वर फोन करून म्हटले की तुम्हांला टाटा पॉवर कंपनी लिमीटेड से ईव्हि चार्जिग स्टेशन का ऑफर आहे. असे बतावणी करून विरेन्द्र दामोदर वर्मा यांना विश्वासात घेवुन टप्प्या–टप्प्याने विरेन्द्र दामोदर वर्मा कडून मोबाईल धारक ने आपल्या अकाउन्टला एकुण १,९०,०००/– भरण्यास सांगीतले परंतु ऑफर बाबत काही कळले नाही, मोबाईल धारकांनी आपली फसवणुक केल्याचे विरेन्द्र दामोदर वर्मा यांचे लक्षात आले.

सदर प्रकरणी फिर्यादी विरेन्द्र दामोदर वर्मा वय ५० वर्ष रा. सरस्वतीनगर काटोल मो.नं. ९४२२८०८०३१ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन मोबाईल क्र.८५९७९४८७५२ धारकाविरुघ्द पो.स्टे. काटोल येथे अप क्रमांक १२२/२०२२ कलम ४२०.भादवी सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधि अन्वये गुन्हा नोंद करुन करण्यात आला. पुढील तपास पोनि महादेव आचरेकर मो.नं. ८३८००७२२११ हे करित आहेत.

## –: अफरातफर :–

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ०५ किमी अंतरावरील मौजा येरला येथे प्रशांत नानाजी मंदे वय ४२ वर्ष रा लॅडमार्क अपार्टमेन्ट फ्रेन्डस कॉलनी मो क्र ८७६६८५८६८७ यांची किराणा माल सपल्याची उडान कंपनी असून सदर कंपनीत किराना माल पोहचविण्याचे काम मुन्नालाल धनिराम शक्य वय ३७ वर्ष रा रामदासपेठ कांचीपुरा पोलीस चौकी मागे मो

क्र ९३७१३३६१०३७ हा करीत होतो त्यांने दिनांक १४.०१.२०२२ चे ०१.०० वा ते १९.३० दरम्यान वेगवेगळया ठिकाणी किराणा माल पोहचविण्या करीता असलेल्या अशोक लेलॅन्ड कंपनीची मालवाहु वाहन क्र एम एच ४० बीजी—२३६३ या वाहनामध्ये किराना सामान भरून ग्राहकाकडे पोहचविण्या करीता प्रशंतात नानाजी मंदे यांने विश्वासाने दिले असता मुन्नालाल धनिराम शाक्य यांने नमुद सदर माल ग्राहकाकडे पोहचवुन दिला काही प्रमाणात शिल्लक माल परत आणला नाही, तसेच डिलेवरी सामानाचे पैसे परत न आणता एकुण रु ७२,७१४ रू ची अफरातफरी करून विश्वासघात केला

सदर प्रकरणी फिर्यादी प्रशांत नानाजी मंदे वय ४२ वर्श रा लॅडमार्क अपार्टमेन्ट फ्रेन्डस कॉलनी मो क्र ८७६६८५८६८७ यांचे रिपोर्ट वरुन आरोपी मुन्नालाल धनिराम शक्य वय ३७ वर्श रा रामदासपेठ कांचीपुरा पोलीस चौकी मागे मो क ९३७१३३६१०३७ चे विरुध्द पो.स्टे. कळमेश्वर येथे अप क्रमांक ९७/२०२२ कलम ४०६,४०७ भादवी अन्वये गुन्हा नोंद करुन करण्यात आला. पुढील तपास सपोनी मुंडे पोस्टे कळमेश्वर मो.क्र ९९७००९४७०९ हे करित आहेत.

## —: अपघातात मृत्यु :—

पो.स्टे. वेलतूर :— अंतर्गत मौजा हरदोली नाईक (पुनर्वसन) येथे हार्वेस्टरच्या कामावर कुलवंतसिंग कुलविंदर सिंग वय ४३ वर्श रा. लौट, पोस्ट — आलोवाल , पो.स्टे—भारसो , जि—पटियाला , राज्य— पंजाब जि—पटियाला , राज्य— पंजाब आला होता व तो हार्वेस्टरवर फोरमेन म्हणुन काम करित होता. आणी नेहमीचा दारू पिण्याच्या सवईचा होता व दररोज दारूपित होता दिनांक २७/०२/२०२२ रोजी रात्री दरम्यान त्याने दारूच्या नशेत हार्वेस्टरच्या ॲगलला रस्सीच्या साहायाने गळफास घेऊन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी देविदयाल भागसिंग वय ५७ वर्श रा. लौट, पोस्ट — आलोवाल, पो.स्टे—भारसो चे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतूर येथे अकस्मात मृत्यु क्रमांक ०४/२०२२ कलम १७४ जाफौ अन्वये प्रकरण नोंद करण्यात आला असून पुढील तपास स.पो.नि.नितेश डोर्लीकर मो.नं. ९५९५६७८२३४ हे करित आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर